19 MAY 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिवाणबहादूर आण्णासाहेब लठ्ठे दशपैलू व्यक्तिमत्व

## ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार यांचे प्रतिपादन : आण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

दिवाणबहादूर आण्णासाहेब लठ्ठे यांनी राजर्षी शाहू महाराज यांची कृती आणि विचार पुढे नेण्याचे काम केले आहे. आण्णासाहेब लठ्ठे हे सत्यशोधक विचारवंत, ब्राम्हणेतर नेता, कार्यक्षम प्रशासक, अर्थतज्ञ, समाजसुधारक, कायदेतज्ञ, शाहू चरित्रकार होते. करवीरनगरीला आण्णासाहेब लठ्ठे यांच्या रुपाने बहुआयामी व्यक्तिमत्व लाभले होते. दिवाणबहादूर आण्णासाहेब लठ्ठे यांचे व्यक्तीमत्व दशपैलू होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधन डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि सांगलीतील लठ्ठे एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात दिवाणबहादूर आण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केले होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. जयसिंगराव पवार, सोबत डॉ. भरत लठ्ठे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, खासदार श्रीमंत शाहू छत्रपती, डॉ. पी. एस. पाटील.**

व्याख्यानमालेचे उद्‌घाटन खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी 'सत्यशोधक आण्णासाहेब लठ्ठे' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. पवार म्हणाले, आण्णासाहेब लठ्ठे यांनी लिहिलेले शाहू महाराजांचे चरित्र नवसंशोधकांना एक साधनग्रंथ म्हणून मार्गदर्शक ठरेल. शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये वसतिगृहे स्थापन करण्यासाठी लोकांना उद्युक्त केले. शिक्षण हे सर्व सुधारणांची गुरुकिल्ली असल्याचा विचार त्यांनी मांडला. आण्णासाहेब लठ्ठे एक थोर समाजशिक्षक होते. त्यांनी जातीभेद, अस्पृश्यता नष्ट करून समाजातील सर्व घटकांना समान संधी व समान स्वातंत्र्य मिळावे यासाठी पुढाकार घेतला. सत्यशोधक समाज घडविण्याचा हा मूलभूत गाभा असल्याचा विचार त्यांनी समाजापुढे मांडला. सत्यशोधन म्हणजे समाजशिक्षण हा विचार आण्णासाहेब लठ्ठे यांनी मांडला. प्रमुख पाहुणे खासदार श्रीमंत शाहू छत्रपती म्हणाले, करवीर संस्थानातील आण्णासाहेब लठ्ठे यांचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात मोठे कार्य आहे. शाहू महाराजांच्या तीन पिढ्यांशी आण्णासाहेब लठ्ठे यांचे घनिष्ठ संबंध होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, २१ व्या शतकातील समाजाने आण्णासाहेब लठ्ठेंचे विचार पुढे नेण्याची आवश्यकता आहे. राजर्षी शाहू महाराज आणि आण्णासाहेब लठ्ठे यांच्यात 'सत्यशोधक' हा समान विचार आहे. लठ्ठे फौंडेशनचे विश्वस्त डॉ. भरत लठ्ठे म्हणाले, अमेरिकेतील वैचारिक गुलामगिरी भारतात येऊ घातली आहे. भारतासारख्या विकसनशील देशातील समस्या दूर करण्यासाठी तरुणांनी काम केले पाहिजे.

प्रास्ताविक लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन अजितनाथ काले यांनी केले. आण्णासाहेब लठ्ठे यांनी १९२४ मध्ये लिहिलेल्या छत्रपती शाहू महाराज यांच्यावरील इंग्रजी भाषेतील चरित्र ग्रंथाच्या पुनरावृत्तीच्या प्रकाशनाचा सोहळा झाला. सूत्रसंचालन प्रा. हेमा गंगावणे व प्रा. पद्मजा पाटील यांनी केले. आभार कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मानले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे व्हाईस चेअरमन चंद्रकांत पाटील, मानद सचिव सुहास पाटील आदी उपस्थित होते.

19 MAY 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ अधिनियमात होणार बदल

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार होणार सुधारणा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये बदल केला जाणार आहे. राज्यात लागू केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानूसार त्यात सुधारणा होणार आहे. याकरिता राज्य शासनाने समिती स्थापन केली आहे.

केंद्र शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू केले आहे. राज्यातील अकृषी विद्यापीठे व स्वायत्त महाविद्यालयामध्ये तसेच संलग्नित महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमासाठी २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून या धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून संलग्नित महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमासाठीही या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

> समितीची अद्याप बैठक झालेली नाही. ती लवकरच होईल. त्यानुसार कामकाजाची रूपरेषा निश्चित केली जाईल.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा सखोल अभ्यास करून, शैक्षणिक क्षेत्रातील विविध संस्था, संघटना तसेच तज्ज्ञांशी याबाबत चर्चा करून समिती अधिनियमाबाबत शिफारशी तयार करेल आणि त्या राज्य शासनाला सादर केल्या जातील.
>
> **-डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ



राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठांची विद्याविषयक स्वायत्तता व सर्वोच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधित्व, उच्च शिक्षणाची अभिवृद्धी, त्यांचे बळकटीकरण व विनियमन याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित बाबीकरिता विविध तरतुदी असणारा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ राज्यात लागू केला आला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने उच्च शिक्षण क्षेत्रात झालेला अमुलाग्र बदल, नवीन शैक्षणिक प्रवाह आदीच्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण अधिक सुसंगत, संशोधनात्मक, रोजगारक्षम असणे व ते समाजातील सर्व घटकांना सहज उपलब्ध व्हावे तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाद्वारे उच्च शिक्षण देणाऱ्या विविध शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे यामध्ये निकोप व पोषक वातावरण निर्माण व्हावे, यासर्वात विद्यार्थी हाच उच्च शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून तसे नियोजन व्हावे याकरीता २०१६ च्या अधिनियमात बदल करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्याकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

### दृष्टिक्षेपात राज्य

(३० सप्टेंबर २०२४ च्या आकडेवारीनुसार)

राज्यात २३ सार्वजनिक, २१ खासगी व एक मुक्त अशी एकूण ५७ राज्य विद्यापीठे आहेत. ११ खासगी, ७ शासकीय व तीन अनुदानित अशी एकूण २१ अभिमत विद्यापीठे आहेत. यासह सात राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था आणि एक केंद्रीय विद्यापीठ आहे, तर ५ हजार ७२५ महाविद्यालये आहेत. यांद्वारे सुमारे ४६ लाख २१ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAY 2025
सकाळ

# पदवी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया आजपासून

## ऑनलाईन, ऑफलाईन सुविधा

कोल्हापूर, ता. १८ : कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेच्या पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेशाची प्रक्रिया उद्या, सोमवारपासून सुरू होणार आहे. त्यासाठी शहरातील वरिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिली आहे.

बारावीचा ऑनलाईन निकाल पाच मे रोजी जाहीर झाला. त्यानंतर अकरा दिवसांनी १६ मे रोजी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्राचे महाविद्यालयांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप केले. मूळ गुणपत्रिका मिळाल्याने सोमवारपासून शहर आणि जिल्ह्यातील बहुतांश महाविद्यालयांमध्ये पदवी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यात काही महाविद्यालयांनी प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन आणि ऑफलाईन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रिया, अर्ज, शुल्क, आदी स्वरूपातील माहिती ठेवण्यात आली आहे. अर्ज भरल्यानंतर कागदपत्रांची तपासणी आणि त्यानंतर निवड यादी प्रसिद्धी, अशी सर्वसाधारणपणे प्रत्येक महाविद्यालयातील प्रवेशाची प्रक्रिया आहे. ही सर्व प्रक्रिया पूर्ण करून १६ जूनपासून पदवी प्रथम वर्षाचे वर्ग भरविण्याचे नियोजन महाविद्यालयांनी केले आहे.

> ‘बारावीचा ऑनलाईन निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडून प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी माहिती घेणे सुरू झाले. या विद्यार्थ्यांची प्राथमिक स्वरूपातील नोंदणी महाविद्यालयांनी करून घेतली आहे. आता मूळ गुणपत्रिका मिळाल्यानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू होईल. त्याची तयारी महाविद्यालयांनी केली आहे.
>
> **- डॉ. व्ही. एम. पाटील**, सचिव, शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशन

### विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षांचा महिनाअखेरीस निकाल

शिवाजी विद्यापीठातर्फे एम. एस्सी. केमिस्ट्री, फिजिक्स, बायोकेमिस्ट्री, अशा विविध २८ अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यात प्रवेश परीक्षा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध वीस केंद्रांवर घेण्यात आली. त्याचा निकाल मे महिन्याच्या अखेरपर्यंत जाहीर करून जूनच्या पहिल्या आठवड्यात प्रवेश फेऱ्या सुरू करण्याचे नियोजन विद्यापीठाने केले आहे.

19 MAY 2025 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमाला

# 'भारत-पाकिस्तान युद्ध आणि सद्य:स्थिती' यावर उद्या डॉ. देवळाणकर यांचे व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचे 'भारत - पाकिस्तान युद्ध आणि सद्य:स्थिती' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. मंगळवारी (दि. २०) सायंकाळी ५ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन येथे हे व्याख्यान होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते.



गेल्या ३८ वर्षांपासून सुरू असलेल्या या व्याख्यानमालेत यावर्षी डॉ. देवळाणकर ३५ वे पुष्प गुंफणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल.

'ऑपरेशन सिंदूर'नंतर सुरू झालेल्या भारत-पाक युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर डॉ. देवळाणकर आपल्या खास शैलीत 'भारत - पाकिस्तान युद्ध आणि सद्य:स्थिती' या विषयावर मांडणी करणार आहेत. गेली तीन दशके शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ. देवळाणकर यांचे नाव विचारवंत, अभ्यासू आणि धोरणात्मक निर्णयक्षमता असलेल्या अधिकाऱ्यांमध्ये घेतले जाते.

पान १० वर

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAY 2025
पुढारी

# 'भारत-पाकिस्तान युद्ध आणि सद्य:स्थिती' यावर उद्या डॉ. देवळाणकर यांचे व्याख्यान

(पान १ वरून)उच्च शिक्षण क्षेत्राला दिशा देणारे, धोरण निर्मितीत मोलाची भूमिका बजावणारे, आंतरराष्ट्रीय राजकारणावर सखोल अभ्यास असणारे, जेएनयू (नवी दिल्ली) येथून एम.फिल., पीएच.डी. पदवीप्राप्त डॉ. देवळाणकर यांनी मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव, राज्य प्रशासकीय सेवा संस्थेचे संचालक, गव्हर्न्मेंट लॉ कॉलेज मुंबईचे प्राचार्य, मनुष्यबळ विकास विभागातील विशेष कर्तव्य अधिकारी, राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक, डॉ. होमी भाभा विद्यापीठात संशोधन व नवोन्मेष विभागाचे संचालक अशा अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे.

19 MAY 2025

तरुण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वारणा महाविद्यालयाच्या कॅन्सर संशोधनाला पेटंट

## वारणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे यांच्याकडून अभिनंदन

प्रतिनिधी
कोल्हापूर

यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयच्या रसायनशास्त्र विभागातील डॉ. राजकुमार पांडव, प्रा. सत्यनारायण आरडे, प्रा. उत्तम कदम, गीतांजली गुरव आणि राहुल धारगे यांनी विकसित केलेल्या ब्रेस्ट कॅन्सरवरील उपचारास उपयुक्त नॅनोकणांच्या निर्मिती पद्धतीला जर्मन सरकारकडून आंतरराष्ट्रीय पेटंट प्राप्त झाले आहे. या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे, डॉ. कल्याणराव गरडकर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल वारणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विलास कार्जिनी यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले.


आर. एस. पांडव


एस. एम. आरडे


यु. डी. कदम


गीतांजली गुरव


आर. डी. घारगे

**महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा**

महाविद्यालयाच्या इतिहासात प्रथमच जर्मन आंतरराष्ट्रीय पेटंट मिळाले आहे. या उल्लेखनीय यशामुळे यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले असून, ही गोष्ट महाविद्यालयासाठी अत्यंत भूषणावह ठरली आहे. त्यामुळे संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. संशोधकांनी केलेल्या नाविन्यपूर्ण कार्याचा उपयोग समाजासाठी व्हावा.

**आमदार डॉ. विनय कोरे,** अध्यक्ष वारणा शिक्षण संस्था

'ब्रेस्ट कॅन्सर'मुळे दरवर्षी लाखो महिलांना जीव गमवावा लागला आहे. अनेक रुग्णांमध्ये उशिरा निदान होणे, पारंपरिक उपचारांचे मर्यादित परिणाम, पुनरावृत्तीची शक्यता ही मोठी आव्हाने आहेत. त्यामुळे अचूक निदान, कमी दुष्परिणाम असलेले उपचार आणि टार्गेटेड थेरपीसारख्या नवीन उपचार पद्धतींची नितांत गरज आहे. संशोधनातून निर्माण होणाऱ्या नव्या उपायांनी रुग्णांचे आयुष्य वाढवण्यास आणि जीवनमान सुधारण्यास मोठी मदत होऊ शकते. या संकल्पनेतून सिल्व्हर-झिंक ऑक्साईड नॅनो कॉम्पोझिट वापरून संशोधकांनी ब्रेस्ट कॅन्सरवर किमोथेरपीपेक्षा प्रभावीपणे उपचार करता येणे शक्य आहे. या संशोधनामुळे कॅन्सर उपचारांना नवी दिशा मिळेल. रुग्णांचे आयुष्य सुसह्य करण्यास प्रभावी मदत होईल. संलग्नित महाविद्यालयांना संशोधन कार्य मदतीसाठी शिवाजी विद्यापीठ नेहमीच अग्रेसर आहे. अशा शब्दात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी संशोधकांचे अभिनंदन केले.

यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाला यशाची गौरवशाली परंपरा आहे. महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक विविध विषयांवर सातत्याने उच्चस्तरीय संशोधन करत असून, रसायनशास्त्र विभागाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व संशोधनसराठी उल्लेखनीय कार्य केले आहे, प्राचार्य डॉ. ए. एम. शेख व रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. एस. शिर्के यांनी संशोधकांचे अभिनंदन केले.